'Draupadi, Padmini and Sita' Ram Manohar Lohia

## द्रौपदी, पद्मिनी आणि सीता

भर दरबारात द्रौपदीने सिद्ध केले की, 'स्वतः हर-लेल्या युधिष्ठिराला, मला पणाला लावण्याचा अधिकारच नाही.' ही करणीदेखील द्रौपदीचे ज्ञान, समज, हिंमत व हजरजबाबीपणा दाखविणारी आहे, आणि या गुणां-मुळेच सावित्री नव्हे तर द्रौपदी मला हिंदुस्थानची प्रतीक व्हावी असे वाटते. केवळ पतिव्रताधर्म आचरला म्हणूनच सावित्रीला श्रेष्ठ ठरविणे हे बुद्धीचे मांद्य आहे.

० ० ०

चितोड पडल्यावर पद्मिनीने अन्य स्त्रियांसह जोहार केला याउलट गेल्या महायुद्धातील रशियन हेर नतालीचे उदाहरण पहा. नतालीला युक्रेनमध्ये जर्मन फलटणीने पकडले. जर्मन अधिकाऱ्याच्या स्वयंपाकघरात नोकरी करता करता तेथून जर्मन फलटणीच्या हालचालींच्या गुप्त बातम्या बिनतारी यंत्राच्या द्वारे ती आपल्या मायदेशात पाठवी. या उपक्रमाद्वारे नतालीने जवळपास साठ-सत्तर हजार जर्मन फौजेला धारातीर्थी लोळविले. नतालीच्या हालचाली जर्मनांच्या लक्षात येताच त्यांनी तिला फाशी दिले. आपल्याला भारतात पद्मिनी नकोत नताली हव्यात.

० ० ०

रामाने सीतेशी केलेला व्यवहार पाहिला की स्त्रिया रामभक्ती कशी करू शकतात याचे आश्चर्य वाटते.

**–राममनोहर लोहिया**